"इ. स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंब-यातील सामाजिक मूल्य : एक तुलनात्मक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

Ãवामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड करिता

कला विद्याशाखेतील मराठी विषयातील

पीएच. डी. पदवी साठी सादर करण्यात येणारा

संशोधन आराखडा

: संशोधक :

गोरे पांडुरंग भिवाजी

एम. ए., बी. एड., नेट, (मराठी)

: मार्गदर्शक :

प्रा. डॉ. गायकवाड भास्कर श्रावण

<´Ö. <., ²Öß. <>ü., ÃÖ™ü, ¯Ößü<“Ö.>üß.

मराठी विभाग प्रमुख

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

´ÖÖ“Ö -2016

“इ. स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंब-यातील सामाजिक मूल्य : एक तुलनात्मक अभ्यास”

प्रस्तावना :

मराठी साहित्यातील कथा, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारापेक्षा 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार अत्यंत लोकप्रिय आहे. कारण 'कादंबरी' हा मानवी जीवन दर्शन घडविणारा, समाजजीवनाचा वेध घेणारा, जीवनाची सखोलता प्रतिबिंबीत करणारा, विविध प्रश्नांची चिकित्सा करणारा, उद्‌बोधन, प्रबोधन करणारा आणि संपूर्ण मानवी जीवनाला कवेत घेणारा वाङ्मयप्रकार आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी या साहित्याबरोबरच 'ग्रामीण साहित्याचा प्रवाह' नावारूपाला आला. या ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण माणसांचे, तेथील बदलत्या कौटुंबिक जीवनाचे, त्यांच्या राहणीमानाचे, रूढी, प्रथा, पंरपरा, चालिरीती, अंधश्रध्दा आदिचे बारकाईने वास्तव चित्रण ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या अनुभवाच्या, कल्पनेच्या व प्रतिभेच्या बळावर शब्दांकित केलेले आहे. मराठी ग्रामीण कादंबरीतून व्यापक जीवनाचा आशय आविष्कृत झाला आहे.

१९६० नंतरच्या मराठी दलित-आदिवासी कादंबरीतून कुटुंबातील व्यक्तींचे दुःख, त्यांचे दारिद्र्य, त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, भौतिक परिस्थितीचे वास्तव चित्रण झाल्याचे दिसून येते. आज जग झपाट्याने बदलत आहे. परिणामी पूर्वीची संयुक्त कुटुंबपध्दती ही बदलत चालली आहे. नवी अर्थव्यवस्था, पाश्चात्य संस्कृती व शिक्षण, औद्योगिकीकरण, नागरिकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, दळणवळणात झालेली वाढ, सामाजिक सूरक्षेचे नवीन कायदे, स्त्री सक्षमीकरण, राज्याचे नवीन कायदे या विविध कारणांमुळे संयुक्त कुटुंबाची रचना बदलून त्याची जागा विभक्त कुटुंबाने घेतल्याचे दिसते. म्हणजेच कुटुंबाचा लहान आकार, कुटुंब सदस्यांमधील संबंधाची घनिष्ठता, सत्तेचे समान वाटप याला महत्त्व प्राप्त होऊ लागले. याचाच अर्थ असा की, पितृसत्ताक अधिकाराला कमी महत्त्व, कुटुंबाच्या आकारातील बदल, विवाहीत स्त्रीचे बदलते कार्यक्षेत्र यामुळे आज कुटुंबसंस्थेला अस्थायी स्वरूप प्राप्त होत असल्याचे दिसते. यासंदर्भात अभ्यासकाने उपलब्ध माहितीच्या आधारे आपले विवेचक विचार मांडले आहेत.

दोन हजारोत्तर दलित-आदिवासी कादंबरीतून आलेल्या सामाजिक जीवनमूल्यांचे प्रकर्षाने

दर्शन होते. त्यात साधारणतः स्वातंत्र्य समता, बंधुता, सामाजिक न्याय तसेच सामाजिक विषमतेचे दर्शन दोन हजार नंतरच्या दलित-आदिवासी कादंबऱ्यांमधून याचे चित्रण आलेले दिसून येते. तसेच दया, क्षमा, शांती, प्रज्ञा, शील, करूणा याही जीवनमूल्यांचे वास्तविक जीवन चित्रण या कादंबऱ्यांतून आलेले दिसून येते.

मनुष्य हा समाजशील प्राणी असल्यामुळे व्यक्ती व समाज यांचे नाते अतूट आहे. माणूस हा समाजात राहिल्याशिवाय आपला सर्वांगीन विकास करू शकत नाही. याचे कारण सुरूवातीच्या काळामध्ये भटक्या अवस्थेत जीवन जगणारा माणूस आपल्या दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी टोळयांनी किंवा समूहाने राहू लागला. यातूनच नंतर 'समाजाची' निर्मिती झालेली आहे. या समाजामध्ये अनेक संस्थाची निर्मिती झाली. त्यापैकीच 'कुटुंबसंस्था' ही एक महत्त्वपूर्ण व संस्कारशील संस्था म्हणून ओळखली जाते. कारण कुटुंबसंस्थेद्वाराच प्रत्येक व्यक्तींवर, बालकांवर संस्कार होत असतात. म्हणूनच मानवी जीवनामध्ये कुटुंबसंस्थेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

कुटुंब व्यवस्थेतील प्रत्येक व्यक्ती परस्परांच्या रक्ताच्या नातेसंबंधानी जोडलेली असतात; त्यामुळेच कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, आस्था, स्नेहभाव, त्यागी वृत्ती असते. म्हणूनच कुटुंबसंस्था ही 'मानवी जीवनावर संस्कार करणारी', पहिली शाळा असून, धडे देणारी सामाजिक संस्था आहे. हे लक्षात घेऊन कौटुंबिक जीवनाचे चिंतन अभ्यासकाने साहित्यकृतींच्या आधारे केले आहे. दलित आणि आदिवासी कांदबऱ्यातील सामाजिक मूल्य यातील साम्य भेद, उद्गम आणि प्रभाव या अंगाने सुस्पष्टपणे जाणून घेऊन याचा उपयोग अभ्यासकांसाठी व्हावा µÖÖÃÖÖŠ ´ÖÖ "इ. स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंब-यातील सामाजिक मूल्य : एक तुलनात्मक अभ्यास" हा विषय घेऊन माझे मार्गदर्शक डॉ. भास्कर गायकवाड यांच्याशी चर्चा केली त्यांनी या विषयाला मान्यता दिली आणि प्रस्तुत विषय मी पीएच.डी. संशोधन कार्यासाठी निश्चित केला. यादृष्टिकोनातून साहित्याचे वाचन करुन शोधप्रबंधाची रुपरेषा तयार केली.

भूमिका :

मराठी साहित्यातील दलित-व आदिवासी हा साहित्याचा प्रवाह हा एक मध्यवर्ती प्रवाह आहे. आजच्या मराठी साहित्याला दलित साहित्याने भरीव असे योगदान दिले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्याच्या कक्षा विस्तीर्ण झाल्या. दलित-आदिवासी माणसांचे जीवन, त्यांचे दुःखानुभव साहित्याचा विषय होऊन वास्तव असे अनोखे भावविश्व साहित्यातून आविष्कृत होऊ

लागले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिम, जनवादी इ. माणसांच्या जीवन चित्रणामुळे या साहित्याचे स्वतंत्र वाङ्मय प्रवाह निर्माण झाले. त्यापैकीच दलित व आदिवासी साहित्य प्रवाह हा अत्यंत महत्त्वाचा साहित्य प्रवाह म्हणून स्थिर झाला आहे.

आधुनिक मराठी साहित्यात नव्या वाङ्मयप्रवाहाचे साहित्य हे महात्मा ज्योतिबा फुले, राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,कार्ल मार्क्स यांच्या विचार व प्रेरणेतून निर्माण झालेले आहे. ग्रामीण साहित्य चळवळीला या विविध समाजसुधारकांचा, त्यांच्या विचारधारांचा वारसा लाभला आहे. दलित आणि आदिवासी समाजातून आलेला लेखक हा या संस्कृतीतून या मातीतून वाढला, घडला आहे. शिक्षणाच्या विकासाबरोबर साहित्याच्या वाचनातून, अभ्यासातून तो आपले स्वतःचे अनुभव जपणे, लेखकाने केलेले निरीक्षण, ज्या जीवनविश्वात तो राहतो, त्या जीवनाचे यथार्थ चित्रण मराठी दलित-आदिवासी कादंबरीतून केले गेले. जे पाहिले, अनुभवले ते आपले जगणे वास्तवाच्या पातळीवर चित्रित करावे म्हणून अनेक साहित्यिकांनी वास्तववादी विचाराच्या अनुभवातून विविध साहित्यकृतींची निर्मिती केलेली आढळते.

आदिवासी जीवन हे कृषिसंस्कृती, शेत-शिवार, निसर्ग, पशू, पक्षी, प्राणी, नद्या, डोंगर याबरोबरच दलित माणूस, तेथील संस्कृती, त्यांची भाषा, येथील माणसांचे स्वभावविशेष, चालिरीती, रूढी, प्रथा, परंपरा, जीवनसंकेत, तेथील कौटुंबिक जीवन, कुटुंबाचे प्रश्न, त्यांच्यातील ताणतणाव, मानवी जीवनात होणारे अनेक खदल-बदल, बदलत्या आधुनिक जीवनशैलीचे आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचे, शिक्षणाचे परिणाम दलित व आदिवासी साहित्यावर झालेले दिसून येतात.

मराठी दलित साहित्यात सर्व वाङ्मयप्रकारांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात लेखन झाले असून सद्यःस्थितीतही नव्या पिढीतील नव्या दमाचे उमदे, तरूण लेखक दलित, आदिवासी आणि ग्रामीण भागातील विविध समस्यांवर साहित्याच्या माध्यमातून आपले विचार प्रकट करीत आहेत. मराठी दलित कादंबरीची निर्मिती ही व्यापक अशा स्वरूपात झाली असून या विविध कलाकृतीतून व्यक्त झालेल्या बदलत्या कौटुंबिक जीवन चित्रणाचा अभ्यास शोध आराखड्याच्या लेखनासाठी महत्त्वाचा ¾ÖÖ™ÝÖÖ. अशा प्रकारे प्रस्तुत शोध आराखड्याची मांडणी करण्याचे योजिले आहे.

संशोधन विषयाचा उद्देश :

1) दलित आणि आदिवासी कांदबऱ्यातील सामाजिक मूल्यांचा शोध घेणे.

२) इ.स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कांदबऱ्यातील सामाजिक मूल्यातील साम्य-भेद मांडणे.

३) दलित आणि आदिवासी कांदबऱ्यातील सामाजिक मूल्यांचा, विषय, आशय, प्रसंग, अनूभव विश्व, जीवनप्रश्न, मानवीमूल्य, कौटूंबिक प्रश्न, सामाजिक विषमता इ. मूल्यांचा तौलनिक अभ्यास पध्दतीच्या आधारे शोध घेणे.

४) विविध सामाजिक चळवळी, विचारधारा यामुळे दलित आणि आदिवासी साहित्य निर्मितीवर कोणता परिणाम झाला ते सागणे.

५) पूर्वीच्या काळात समाज बंधनात अडकलेल्या दलित आणि आदिवासी समाजाने लादलेले बंधने झुगारून देवून इतर माणसासारखाच मी ही माणूस आहे या जाणीवेचा शोध इ.स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंबऱ्याच्या आधारे घेणे.

६) दलित आणि आदिवासी कांदबऱ्यातील भाषिक वैशिष्टय आणि वेगळेपणाचा शोध घेणे.

एकूणच इ.स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंबऱ्यातून चित्रित झालेली दलित आणि आदिवासी समाजाची वास्तव स्थिती, सामाजिक मूल्य, मानवी मूल्य यांचा शोध घेणे, साम्य स्थळे दाखविणे. याआधारे तौलनिक चिकित्सका करणे हा या संशोधन विषयामागील हेतू †ÖÆ.

संशोधन विषयाची सामग्री :

"इ. स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंब-यातील सामाजिक मूल्य : एक तुलनात्मक अभ्यास" या विषयावरील संशोधनासाठी इ.स. २००० नंतरच्या निवडक दलित आणि आदिवासी कादंबऱ्याची निवड करण्यात आलेली आहे. त्याची नोंद परिशिष्टामध्ये केलेली आहे. संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी प्रस्तूत कादंबऱ्यावरील समीक्षा ग्रंथांचा याबरोबरच उपयुक्त अशा अभ्यासपूरक विविध वैचारिक ग्रंथांचा, संशोधनासाठी संदर्भपूरक असलेल्या, अभ्यास विषयाला अनूषंगून असलेल्या वेगवेगळया वाङमयीन, वैचारिक मासिकातून, वर्तमानपत्रातून, नियतकालीकातून प्रकाशित झालेले लेख तसेच या संदर्भात प्रकाशित झालेल्या संदर्भग्रंथातील लेखकांचे विचार आणि अप्रकाशित संशोधन प्रबंध इ.चा आधार घेतला जाईल.

संशोधनाचे महत्त्व :

संशोधनामध्ये प्रत्यक्ष कृतीशील संशोधनाला आणि वास्तविक सामाजिक जीवनमूल्यांना अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. प्रस्तुत शोध आराखड्यातून दलित व आदिवासी कादंबऱ्यातील सामाजिक आणि जीवनमूल्ये यांचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. या माध्यमातून उपेक्षित म्हणून जीवन जगणारी दलित व आदिवासी समाजातील माणसे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक,

राजकीय पातळीवर आजही उपेक्षित आहेत. त्यांचे कादंबऱ्यातून होणारे वास्तविक चित्रण व जीवन अज्ञान, अंधश्रध्दा, रूढी, प्रथा, परंपरा चालिरीती यांचा विविध अंगाने अभ्यास करून नवीन निष्कर्ष मांडणे हे या शोध प्रबंधात महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या अनुषंगाने दलित व आदिवासी ÃÖÖ×ÆüŸµÖ ÃÖÖÆü×ŸµÖ Ö□ú• ¤ü¼Öß¾ÖÖ µÖÖ ¤ü¼ÖßÖ†µÖ ³µÖÖÃÖ ÃÖ¾Ö¾Öß ¾ÖÖµÖÖ µÖÖ† ÖÖ¼Öê ÖÖüÖ

• ÖÖ□Öçü† ÖÆê

संशोधन पध्दती :

"इ. स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंब-यातील सामाजिक मूल्य : एक तुलनात्मक अभ्यास" या शोधप्रबंधाच्या पूर्ततेसाठी इ.स. २००० नंतरच्या निवडक दलित आणि आदिवासी कांदबऱ्यांचा आधार घेतला जाईल. या कादंबऱ्यातील सामाजिक मूल्यामधील साम्य-भेद, उद्गम आणि प्रभाव या अंगाने उलगडा करण्यासाठी तौलनिक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येईल. याबरोबरच विश्लेषणात्मक संशोधन पध्दती तसेच ज्येष्ठ रसिक-वाचक यांच्याकडून पूरक माहिती संकलित केली जाईल. लिखित साधनांच्या वापरामध्ये निवडक मूळ कांदबऱ्या, त्यावरील समीक्षा ग्रंथ, परिक्षणे आवश्यक वाटल्यास लेखक, विचारवंत, तज्ञ मार्गदर्शक यांच्याशी संवाद करून प्रस्तूत शोध कार्य करण्याचा निश्चित केला आहे.

“इ. स. २००० नंतरच्या दलित आणि आदिवासी कादंब-यातील सामाजिक मुल्य : एक तुलनात्मक अभ्यास”

प्रकरण पहिले :

दलित आणि आदिवासी कादंबरी : स्वरूप आणि विकास

कादंबरी हा एक लोकप्रिय साहित्यप्रकार आहे. वाङ्मयाच्या विविध प्रकाराहून कादंबरीची प्रकृती ही मुळातच भिन्न आणि व्यापक अवकाशाला कवेत घेऊन समग्र जीवनाचे प्रतिबिंब ती आत्मसात करू शकते. मराठी साहित्यात दलित आणि आदिवासी कादंबरीने आपले स्वतःचे वेगळेपण निर्माण करून कादंबरी या वाङ्मयप्रकारात जे एक महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे ते कसे? याचा यथार्थ मागोवा प्रस्तुत प्रकरणात संशोधक घेणार आहे.

कादंबरी या वाङ्मयप्रकाराची संकल्पना सुस्पष्ट करण्याबरोबर अनेक अभ्यासकांनी कादंबरीच्या ज्या व्याख्या सांगितल्या आहेत. त्याचा आधार घेऊन 'कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप कसे आहे. ते सांगण्याबरोबरच दलित-आदिवासी कादंबरीचे वेगळेपण विशद करून सांगण्याचा प्रयत्न अभ्यासक करणार आहे. कादंबरी वाङ्मयाच्या उगमापासून कादंबरीचा विकास कसा झाला. याचाही यथार्थ मागोवा घेऊन कादंबरीच्या वाटचालीचे स्वरूप विशद करणार आहे.

प्रकरण दुसरे :

दलित कादंबऱ्यातील सामाजिक आणि जीवनमूल्ये

मानव आणि समाज यांचे अतूट नाते आहे. मनुष्य हा समाजाशिवाय जीवन जगू शकत नाही, स्वतःची प्रगती करू शकत नाही. सामाजिक संघटनांचे जाळे म्हणजेच समाज होय. सामाजिक विविध संस्थापैकी मानवी जीवनासाठी अत्यावश्यक, प्रत्येकावर संस्कार करणारी, कुटुंबसंस्था ही अनन्यसाधारण सामाजिक संस्था आहे.

१९६० नंतरचा कालखंड मराठी कादंबरी वाङ्मयाच्या संदर्भात अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. कारण या कालखंडामध्ये एकूणच समाजव्यवस्थेमध्ये आमूलाग्र परिवर्तन होऊ लागले. दलित भागामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. दलित माणूस शहराकडे कामाच्या, उद्योग, व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतर करू लागला. या अनुषंगाने त्याचे सामाजिक जीवन आणि जीवनमूल्यांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणातून करण्याचे योजिले आहे.

प्रकरण तिसरे :

<u>आदिवासी कादंबऱ्यातील सामाजिक जीवनमूल्ये</u>

आजचे जग झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे दलित समाजाच्या राहणीमानातही बदल होत आहे. म्हणजेच पारंपरिक कुटुंब आणि आधुनिक कुटुंब यामध्ये फरक असलेला दिसून येतो. त्यांच्यात सामाजिक जीवनमूल्यांची रूजवणूक करून त्यांच्या सामाजिक जीवनाविषयीच्या जीवनमूल्यांची रूजवणूक करणे हे निवडक कादंबरी वाङ्मयाच्या आधारे अभ्यासकाने करण्याचा प्रयत्न करण्याचे ठरवले आहे.

प्रकरण चौथे :

<u>दलित आणि आदिवासी कादंबऱ्यातील सामाजिक आणि जीवनमूल्यांचे तुलनात्मक अध्ययन :</u>

दलित म्हणजे उपेक्षित, वंचित समाज व आदिवासी म्हणजे दऱ्याखोऱ्यामध्ये वास्तव्य करणारा व निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा इतर सोयी सुविधांपासून वंचित असणारा घटक आहे. त्यांच्यामध्ये असलेल्या वेगवेगळ्या परंपरा, रितीरिवाज, त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती आणि दलित समाजातील शिक्षणाचा स्वीकार केल्यामुळे त्यांच्यामध्ये होणारा बदल या दृष्टीने या प्रकरणातून तुलनात्मक अभ्यास प्रस्तुत प्रकरणातून करण्याचे ठरवले आहे.

प्रकरण पाचवेः

<u>दलित आणि आदिवासी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन</u>

मराठी साहित्यामध्ये दलित आणि आदिवासी साहित्यातील 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार आता स्थिर झाला असून विविधांगी प्रभावी असे दर्शन मराठी दलित आणि आदिवासी कादंबरीत प्रतिबिंबीत झाले आहे. दलित व आदिवासी समाज जीवनाचा समग्र जीवनपट मांडण्यासाठी अत्यंत कौशल्याने, आपल्या प्रतिभेने पाहिलेले, वास्तवाभिमुख जीवनानुभव कलावंत, लेखक, कादंबरीकार सांगतात. दलित आणि आदिवासी जीवनातील विविध समस्या डोळसपणे पाहूनच कादंबरीकार लेखणी हातात घेतात. दलित व आदिवासी समाजजीवनातील संयुक्त कुटुंबपध्दती, कुटुंबातील परस्परांचे नातेसंबंध, भाव-भावकी, परस्परातील प्रेम, सहकार्य, सत्तासंघर्ष त्यांच्यातील ताणतणाव, वैमनस्य, मराठी दलित व आदिवासी कादंबरीतील सामाजिक जीवन चित्रणाचे मूल्यमापन करण्यासाठी प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने अभ्यासकाला ज्या सामाजिक जीवन-जाणिवा निदर्शनास

आल्या त्या प्रत्येक कलाकृतीतून ज्या संवेदना, भावना, जाणिवा व विचार लक्षात घेऊन दलित व आदिवासी समाजजीवनातील कादंबरीच्या अंगाने आवश्यक ते चिंतन, मनन, विचार करून आपले अभ्यासपूर्ण मत मांडण्याचा यथोचित प्रयत्न केला जाणार आहे.

प्रकरण सहावे :

उपसंहार आणि निष्कर्ष

उपसंहार हे प्रकरण अभ्यासकाने तयार केलेल्या शोधप्रबंधाच्या आधारे असून ते एकूण पाच प्रकरणात मांडण्यात येणार आहे. प्रत्येक प्रकरणातून मांडलेल्या विचारांचा यथार्थ परामर्श घेऊन यथातथ्य असे मुद्देसुद नेमके विचार उपसंहारातून मांडले जातील.

¯Öx¸|x¿ÖÂ™|¶ : (²Ö)

संदर्भग्रथ सूची :

†) मुळ ग्रंथ :

1. **भोसले भास्कर : दैना**
२. सरकुंडे महादेव : ¾ÖÖ›|Ö
३. गवारी गोपाल : कोळवण
४. गावित नजूबाई : तृष्णा
5. ´Ö›|Ö¾ÖÛ ²ÖÖ²ÖÖ¸|Ö¾Ö : ™|ÖÆ|Ö

²Ö) आधार ग्रंथ :

१. डॉ.कुलकर्णी शौनक : ´ÖÆ|Ö¸|ÖÂ™|ÖŸÖÛ»Ö †Ö×¤¾ÖÖÃÖÛ
२. डॉ.मांडे प्रभाकर : ³ÖÖ¸|ŸÖÖŸÖÛ»Ö †Ö×¤¾ÖÖÃÖÛ
३. डॉ.सौ.देगांवकर शैलजा, डॉ.मुनघाटे प्रमोद (संपा.) : †Ö×¤¾ÖÖÃÖÛ ´Ö¸|ÖšÛ ÃÖÖ×ÆŸµÖ : स्वरूप आणि समस्या
४. डॉ.तुमराम विनायक : मराठी वाङ्‌मयातील नवीन प्रवाह
डॉ.लिंबाळे शरणकुमार(संपा. : मराठी विश्वकोश, खंड ८
५. डॉ.तुमराम विनायक : आदिवासी साहित्य स्वरूप व समीक्षा
7. ›|Ö. •ÖÖ¬Ö¾Ö ÃÖÖ¤|Ö´Ö : †Ö×¤¾ÖÖÃÖÛ ÃÖÖ×ÆŸµÖ

८. डॉ.चवरे रा.गो. : अंध जमात साहित्य आणि संस्कृती

९. डॉ.सबनीस श्रीपाल : आदिवासी, मुस्लिम, ख्रिश्चन साहित्यमिमांसा

१०. प्रा.निकम गौतम : आदिवासींच्या समस्या : एक अभ्यास

११. डॉ.रोंगटे तुकाराम : आदिवासी साहित्य : चिंतन आणि समीक्षा

१२. डॉ.भगत दत्ता : दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर

१३. डॉ.भगत दत्ता : ¤¡×»ÖÝÖ ÃÖÖ×ÆüŸµÖÖ“Ö ÃÖÖ¤ü¸ü¯ÖÖÃ¡Ö

१४. डॉ.कुलकर्णी गो.म : दलित साहित्य : एक चिंतन

15. >¡Ö.»ÖÖ•Ö¾ÖÖ¸ü •µÖÖÝÖê : दलित साहित्य समीक्षा

१६. डॉ.फडके भालचंद्र : दलित साहित्य वेदना व विद्रोह

१७. डॉ.मांडे प्रभाकर : दलित साहित्याचे निराळेपण

१८. डॉ.मनोहर यशवंत : बांधिलकी आणि साहित्य

१९. कवठेकर बाळकृष्ण : दलित साहित्य : एक आकलन

२०. डॉ.नेमाडे भालचंद्र : टीकास्वयंवर

२१. प्रा.कांबळे कमलाकर : दलित साहित्य शोध आणि आस्वाद

संशोधक

गोरे पांडुरंग भिवाजी

एम. ए., बी. एड., नेट, (मराठी)

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. गायकवाड भास्कर श्रावण

<´Ö. <., ²ÖÛ. <>¡., ÃÖ™¡, ¯ÖÛ<“Ö.>¡Û.

मराठी विभाग प्रमुख

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा